# उपराळकर पंचविशी

## उल्हास राणे

### अध्याय दुसरा

पौष अंवसेचा शुभ मुहूर्त! माघाचं आगमन होणार उद्या, लगेचच गणेशाला सोबत घेऊन. शिवाय पाच दिवसांनी आहे वसंत पंचमी, विद्यादायिनी सरस्वतीचं दर्शन. हा आहे शिशीर–वसंताचा पाठशिवणीचा काल! निसर्गाने तर फुलायला सुरवात केली आहेच, त्यातच वातावरण प्रणयगंधाने धुंद व्हायला लागलं आहे. चला तर या 'शुभंकर' माघाचं आगत स्वागत करायला, पुन्हा एकदा आटपाट नगरीच्या – 'सुंदरवाडी' परिसरात.

वास्तुपुरुष गेला पंधरवडाभर निसर्ग आणि विकास यांसंबंधी उपराळकराने घातलेलं कोडं सोडवण्याच्या प्रयत्नात परिसरातील भटकंतीत गुंगला होता. आज पौष अंवसेची पहाट. थंडी ओसरत होती आणि वास्तुपुरुषाला रात्रीपासूनच ओढ लागली होती उपराळकर देवराईची, देवचाराला भेटायची. शांत, अंधाऱ्या वातावरणातच वास्तुपुरुष वाघेरीच्या पूर्व उतारावरील डोंगरीवर पोचला. चंद्रम्याच्या विरहाने चांदण्या अधिकच चमचमत होत्या आणि वास्तुपुरुषाला वाट दाखवत होत्या. डोंगरीवरून दिसणाऱ्या पूर्व आणि दक्षिण क्षितीजाकडे वास्तुपुरुषाने नजर फिरवली आणि त्याच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमललं. पूर्व क्षितीजापासून ते अगदी डोक्यावरपर्यंत तारकांच्या चमचमाटातसुद्धा शांत प्रकाशाने उजळणाऱ्या पंचग्रहमालिकेच्या दीपमाळेने त्याला आनंदी केलं. पूर्व क्षितीजाला चुंबत बुध आणि शुक्र, तर त्यांच्यापुढे निघाले होते शनी, मंगळ आणि अगदी डोक्यावर गुरू. हा नक्कीच शुभ योगायोग आहे, आज उपराळकराचं समाधान करायचंच. सूर्याच्या पहिल्या सोनेरी किरणांनी वाघेरीच्या प्रचंड शीळेला स्पर्श केला आणि वास्तुपुरुषाला त्या दिशेकडेच आकर्षित केलं. गर्द हिरवाईतून जाणाऱ्या नागमोडी वाटेने वाघेरीचा चढ पार करताना वास्तुपुरुष परिसरातला निसर्ग अनुभवत होता, पक्ष्यांच्या भूपाळ्यांना दाद देत होता, फुलपाखरांच्या नर्तनावर ताल धरत होता, वनपुष्पांच्या गंधात धुंद होत होता. शिखरावर पोचताच वास्तुपुरुष प्रथम त्या प्रचंड शिळेवर चढला आणि उभं राहून त्याने चहू बाजूला नजर टाकली. आग्नेय दिशेला नदीच्या कुशीत विसावलेल्या गावाचं विहंगम दृष्य पहाताना तो स्वतःमध्येच हरवून गेला. या निसर्गसुंदर गावाला 'आदर्श' स्वरूप

कसं देता येईल या विचारात तो गढून गेला. गेल्या पंधरवड्यातल्या विचार मंथनातून एक स्वप्न समोर तरळायला लागलं होतं. वास्तुपुरुष त्या स्वप्नसृष्टीत रममाण झाला.

अचानक झालेल्या फडफडाटाने आणि काहीशा कर्कश चित्काराने वास्तुपुरुष भानावर आला. समोरच्याच कनकचाफ्यावर धनेश पक्ष्याच्या युगुलाचं प्रणयाराधन चालू होतं आणि मावळते सोनेरी सूर्यकिरण त्या वृक्षाला आणि जोडीला गोंजारत होते. बहुधा जवळपासच्याच एखाद्या वृक्षाच्या ढोलीत त्यांचं घरकुलही थाटलं जात असणार. वास्तुपुरुषाला आता त्या घरकुलाची ओढ लागली. हे तर त्याचंच कार्यक्षेत्र नव्हे का? धनेश युगुलाने एक इशारा दिला आणि फडफडत दक्षिणेकडे प्रयाण केलं. काही अंतरावरील लालचुटुक फुलांनी बहरलेल्या काटेसावरीवर स्थिर होत त्यांनी माना वरखाली वेडावत वास्तुपुरुषाला आवतण दिलं. आता वास्तुपुरुषाने त्या युगुलाचा मागोवा सुरू केला आणि वाघेरीच्या दक्षिण उतारावरील हिरवाईत एक लपंडाव रंगायला लागला. सोनेरी संधीप्रकाशाचं रूपांतर हळू हळू अंधारणाऱ्या सावल्यांच्या गूढ खेळात होत असतानाच वर नभांगणात चंदेरी चमचमाट सुरू झाला. धनेश युगुलाची फडफडणारी धूसर सावली एका वटवृक्षावर विसावली आणि वास्तुपुरुषाला ओळखीच्या परिसरात आल्याचं जाणवलं. धनेश युगुलाने त्याला उपराळात पोचवलं होतं. त्या कातर अंधारातही वास्तुपुरुषाचं लक्ष धनेश पक्ष्यांच्या अर्धवट खोदलेल्या ढोलीकडे गेलं. किती अपूर्वाईचं घरकुल आणि जीवनचक्र! मानवाला किती शिकता येईल अशा निसर्ग निरीक्षणातून. पण सद्या तर ‘आधुनिक’ मानवाची नाळच तुटली आहे निसर्गापासून. वास्तुपुरुषाने एक हताश उसासा सोडला आणि तोच त्याला जाणवलं की कोणीतरी आपल्याला धीर देत आहे.

“हतबल नको होऊ माझ्या राजा! आता तर कुठे या पर्यावरण परिवर्तनाला सुरवात होते आहे. बरं झालं की माझ्या धनेश निसर्गदूतांनी तुला वेळेवर इथपर्यंत पोचवलं. मी पहात होतो तुला सकाळीच वाघेरीवरून गावदर्शन करताना. काय मग, गावाचा ‘स्मार्ट’ आराखडा तयार झाला का?” उपराळकर देवचाराचा धीरगंभीर आवाज ऐकून वास्तुपुरुष उत्साहित झाला.

“होय महाराजा! या गावाच्या संतुलित विकासाची सुरवात करणारी ग्रामयोजना माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट आहे आणि हीच संकल्पना भारतातील इतर गावांसाठी तिथल्या स्थानिक परिस्थितीनुरूप राबवता येईल हीही खात्री आहे. शिवाय यापैकी काही गावं वाढतील, नगरांमध्ये रूपांतरीत होतील. त्यावेळी या पर्यावरण संवर्धन आणि संतुलित विकासाच्या भक्कम पायावर आधारीत नियोजनामुळे ती उभरती नगरंही आपोआपच त्याच मार्गाने, काहीसे फेरबदल करून,

नाविन्यपूर्ण कल्पना राबवून विकसीत होतील हे निश्चितच.  ही संकल्पना पर्यावरण आणि नैसर्गिक परिसंस्था या गाभ्याभोवती उमलेल तर विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या यथार्थ सहाय्याने ती बहरेल.  सर्वप्रथम आपण या संकल्पनेचं ढोबळ चित्र पाहू.  या सर्वांगिण विकासाचं मूलभूत सूत्र आहे निसर्ग आणि विकास यांचं संतुलन.  ते साधण्यासाठी आपल्या या पृथ्वीतलावरील मर्यादित जमिनीचा अनुरूप वापर हे आवश्यक ठरतं.  संतुलित विकासाच्या तत्त्वानुसार ग्रामक्षेत्रातील १/३ जमीन ही संपूर्णपणे नैसर्गिक परिसंस्थांसाठी असेल, १/३ जमीन ही मानव वापरासाठीचा हरित प्रदेश असेल ज्यात शेती, बागायत, उद्यानं, क्रिडांगणं वगैरे येतील.  आता उरलेली १/३ जमीन ही मानवी वसाहतीच्या विकासासाठी असेल."

उपराळकर खुलला, "अरे वा! म्हणजे प्रत्येक ग्रामक्षेत्रात तू माझ्यासारख्या देवचारांची आणि त्यांच्या निसर्गदूतांची सोय केलेली दिसते आहे.  सुरवात तर छानच आहे.  पण याच्याशी निगडीत एक प्रश्न विचारतो.  मानवी वसाहती या त्यांना उपयुक्त अशा परिसरात वसल्या. पाणी, सुपिक जमीन, अन्नपुरवठा, दळणवळण इत्यादि मूलभूत गरजांवर आधारीत त्या वाढू लागल्या.  आता काही काळानंतर तुझी १/३ जागेची मर्यादा त्यांना जाचक वाटणार नाही का?"

"नाही महाराजा!  याच कारणासाठी तर मी त्यांची निसर्गाशी जवळीक साधून देणार आहे. त्याने नैसर्गिक परिसंस्थाकडून शिकण्यासारखं पुष्कळ आहे.  नैसर्गिक परिसंस्थेतील घटक त्यांच्या जीवनचक्रातून समतोल साधत असतात, एकमेकांवर नियंत्रण ठेवत असतात, एकमेकांच्या आधाराने रहात असतात.  प्रत्येक परिसराची एक मूलभूत क्षमता असते आणि त्या क्षमतेच्या मर्यादेत परिसरातील घटक गुण्यागोविंदाने नांदत असतात.  मानवी वसाहतींचंही तसंच आहे, त्यांचीही क्षमता आवश्यक अशा घटकांवर अवलंबून असते.  त्यातील प्रमुख म्हणजे पाणी, अन्न आणि उपजिवीकेची साधनं.  मानवी लोकसंख्या ही अतिवेगाने वाढत असते, तर नैसर्गिक संसाधनं ही उत्क्रांतीच्या संथ गतीने प्रगती करत असतात.  या दोघांचा समतोल साधायचा तर एका बाजूला लोकसंख्या नियंत्रण आणि त्याचबरोबर विज्ञान–तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापराने नैसर्गिक संसाधनांत वाढ करायला हवी.  त्यातलाच आणखी एक योग्य मार्ग म्हणजे अशा वसाहतींचं विकेंद्रीकरण.  शिवाय तसं पाहिलं तर जगभरच्या आदर्श विकसीत परिसरांच्या उदाहरणांवरून लक्षात येईल की विकासासाठी १/३ क्षेत्र हे अगदी सयुक्तिक, पुरेसं आहे." वास्तुपुरुषाने अगदी शास्त्रशुद्ध मांडणी करून आपला मुद्दा पटवण्याचा प्रयत्न केला.

उपराळकर देवचाराने स्मितहास्य केलं, “चला पुढे, सैद्धांतिक जंजाळातून बाहेर पडून प्रत्यक्ष जमिनीवर उतरूया.”

वास्तुपुरुष खुशीत आला, “गावाच्या आग्नेयेला पूर्व–पश्चिम दिशेने वहाणारी नदी ही एक नैसर्गिक परिसंस्था तर दुसरी गावाच्या वायव्येला वाघेरीच्या पूर्व उतारालगतची मिश्र–आर्द्र जंगलाची परिसंस्था, त्यातील सर्व नैसर्गिक प्राणीमात्रांसह. शिवाय इथल्या तीन देवरायाही. एक प्रकारे गावाला आलिंगन देऊन त्याचा सांभाळ करणारा हा निसर्गपट्टा. त्यानंतर आतला हरित विभाग. नदीकिनारीचा सुपिक शेतजमिनीचा ‘सस्यशामलाम्’ परिसर,अगदी तिच्या सर्वोच्च पूररेषेपर्यंतचा आणि गावातील वाड्यांच्या अधून मधून आणि वाघेरीच्या दिशेने असलेला आंबा, काजू, फणस, कोकम इत्यादि बागायतीचा ‘सुजलाम्, सुफलाम्’ परिसर. गावच्या विखुरलेल्या वाड्यांनी आधीच विकेंद्रीकरणाचा मार्ग दाखवला आहे आणि आपण त्याच मार्गाने या वसाहतींच्या पुढील विकासाचं नियोजन करणार आहोत, त्यांच्या सयुक्तिक वाढीसाठी नियोजीत जागा सोडणार आहोत. गाव निसर्गतःच ज्या पद्धतीने इतक्या वर्षांत विकसीत झालेलं आहे त्याच मार्गाने पुढील सुविधांचीही मांडणी होईल. काही मुख्य पांदणींचं रूपांतर रस्त्यांमध्ये होईल, इतर गावांना जोडणारे रस्ते रुंद होतील आणि गावाच्या मधून जाणाऱ्या राज्यमार्गाच्या दुतर्फा जागा सोडून सदाहरित, स्थानिक वृक्ष आणि उपयुक्त झुडुपं यांचा एक ‘जैवविवीधता मार्ग’ तयार होईल. या रस्त्याच्या कडेने अस्ताव्यस्त पसरलेल्या बाजारपेठेचं आणि बस स्थानकाचं एकत्रित पुनर्नियोजन करून एका आकर्षक, स्थानिक संस्कृतीशी जुळणाऱ्या अशा व्यापारी विभागाची निर्मिती होईल. शाळांचे परिसर विस्तारीत केले जातील आणि त्यांना क्रिडांगणांची, व्यायामशाळांची आणि कलासंकुलांची जोड दिली जाईल. या विकासाबरोबरच सामूहिक सामाजिक आणि पर्यावरणीय सुविधा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विकसीत केल्या जातील ज्यात माती, पाणी, ऊर्जा, सांडपाणी, कचरा इत्यांदिंच्या व्यवस्थापनाचा अंतर्भाव असेल. या कोकण परिसराची एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे आणि या वारश्याचं जतन इथली मंदिरं, सार्वजनिक इमारती, निसर्ग परिसर इत्यादिंमधून करण्यात येईल. हा विकास शहरांची नक्कल करणार नाही तर तो इथल्या शेतकऱ्यांच्या गरजांना आणि त्यांच्या उभरत्या अपेक्षांना विज्ञान–तंत्रज्ञानातून प्राधान्य देणारा असेल. हे नियोजन लोकसहभागानेच होईल आणि गावाचं व्यवस्थापनही ग्रामस्वराज्य संकल्पनेनुसार होईल.”

अतिशय भावविवशतेने आपली सर्वांगिण संतुलित ग्रामविकासाची संकल्पना मांडणाऱ्या वास्तुपुरुषाला उपराळकराने अलगद थांबवलं. “वास्तुपुरुषा तुझं ‘सादरीकरण’ अगदी उत्कृष्ट

झालं, पण हा झाला तुझा ‘मास्टर प्लॅन’.  मला तो भासतो आहे त्या चकचकीत मासिकांमधून मांडल्या जाणाऱ्या फसव्या प्रकल्पांसारखा!  मला हवी आहे तपशीलवार संकल्पना – इमारतींची, सुविधांची, ग्रामोद्योगाची, पर्यावरण व्यवस्थापनाची, निसर्ग संवर्धनाची.  मला तुझा हिरमोड नाही करायचा.  पण मला सांग, इथे होऊ घातलेल्या नवीन इमारतींची योजना, रचना कशी असणार आहे?  आधुनिकतेच्या हव्यासापायी होणारं पर्यावरणाकडचं दुर्लक्ष तू कसं रोखणार आहेस?  तुझ्याकडे काय पर्याय आहेत आणि ते लोकांना कसे पटवणार आहेस?”

पुन्हा एकदा वास्तुपुरुष काहीसा गडबडला.  थोडासा विचार करून गांभिर्याने म्हणाला, “देवचारा, माझी मूलभूत संकल्पना तर योग्य आहे ना?  मला अधिक वेळ दे, संपूर्ण तपशीलवार मांडणी तुझ्यापुढे करतो.  अगदी इमारतींपासून सुरवात करूया का?”

“वास्तुपुरुषा, तुझी संकल्पना, विचार योग्य आहेतच.  आपण त्यांना प्रात्यक्षिकाकडे कसं नेता येईल ते पाहू.  मला आहे काळजी माझ्या निसर्गाची आणि पर्यावरणाची.  चालेल, विचार कर पंधरवडाभर आणि सुरवात करू या परिसरासाठी आदर्श इमारतींपासून.”

खर्ज स्वरात वास्तुपुरुषाने गाऱ्हाण्याला सुरवात केली, “हे देवा–महाराजा उपराळकरा, माझ्याकडून झालेली चूकभूल पोटात घे.  तुझ्या अपेक्षांची पूर्तता करेन ही माझी शपथ, रे महाराजा.  होय महाराजा!”

उपराळकर देवचाराच्या मनात काही चलबिचल चालली होती, त्याला वास्तुपुरुषाबद्दल सहानुभूती वाटत होती.  “वास्तुपुरुषा, बस जरा इथे या माझ्या या शीळेला टेकून.  मला तू आवडायला लागला आहेस आणि या क्षणी मला तू बळीराजासारखा भासतो आहेस, त्या वामनाने भूगर्भात गाडून टाकलेला.  आता ऐक काहीशी तशीच, तुझी जन्मकहाणी – मत्स्यपुराणातील दंतकथा!  तू आहेस परम शिवभक्त, प्रत्यक्ष महेशाच्या स्वेदगंगेतून जन्मलेला.  तुझ्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भोळ्या सांबाने दिलेल्या वराने तू झालास त्रिभुवनांचा ताबेदार, सर्वशक्तीमान.  पण त्यामुळे भयकंपित झालेल्या ग्रह–नक्षत्रं, देव–दानव यांनी एकत्र येऊन तुला घेरलं आणि त्यांच्या एकत्रित प्रचंड ताकतीने तुला जमिनीवर पालथं पाडलं, तुझ्या शरीराच्या विवीध अवयवांवर एकेकाने बसून तुला जमिनीत जखडून टाकलं, एका चौकटीत.  मग तुला दिलासा मिळावा म्हणून तुझं नामकरण केलं ‘वास्तुपुरुष’ म्हणून आणि ती तुला कैद केलेली चौकट झाली ‘वास्तुपुरुष मंडल’!  त्या चौकटीतल्या प्रत्येक घरावर या सर्वांनी आपापला ताबा ठेवला आणि तुला ‘आशिर्वाद’ दिला की यापुढे पृथ्वीतलावरील सर्व बांधकाम हे तुझ्या आदेशानुसारच

होईल.  वास्तुपुरुषा, आता हा आशिर्वाद की शापवाणी हे तू चांगलंच जाणून आहेस.  मी देवचार तुला एक रहस्य सांगतो, तुझ्या सुटकेचं.  यापुढील तुझं बांधकामाचं नियोजन, धोरण आणि आदेश हे जर निसर्ग–पर्यावरण संवर्धनावर आणि संतुलित विकासावर आधारीत असेल तर होईल तुझी मुक्तता या ‘मंडला’तून.  मी या देवराईचा, निसर्गसृष्टीचा तारणहार आहे.  तुला या बाबतीत माझं समाधान करायला हवं.  चल आता, माघ प्रतिपदेची पहाट झाली आहे.  ती नभांगणातली पंचग्रहमालिका तुला पूर्व दिशेने बाहेरचा मार्ग दाखवेल.  पुढच्या पौर्णिमेला माझे निसर्गदूत इथे घेऊन येतील तुला आपसूकच.  शुभेच्छा!”

आपल्या जन्मकहाणीच्या आणि मुक्ततेच्या दोलायमान अवस्थेत वास्तुपुरुषाची नजर वर पंचग्रहमालिकेकडे गेली.  ही ग्रह–नक्षत्रं त्याला आता वेगळीच भासायला लागली.  पूर्व क्षितीजावर उमलत असलेली उषःप्रभा मात्र त्याला मुक्ततेची आशा दाखवत होती.

उल्हास राणे

१९ फेब्रुवारी २०१६

‘Brindavan’, 227, Rajmahal Vilas Extn. – II
HIG Colony, First Main Road
Bengaluru – 560094
E-mail: ulhasrane@gmail.com
Mobile: +91 9448149236; +91 80 23417283